# श्री स्वामी समर्थ तारक मंत्र

Swami Samarth Tarak Mantra — The Saving Mantra of Swami Samarth

निशंक हो, निर्भय हो मना रे ।
प्रचंड स्वामीबळ पाठीशी रे ॥
अतर्क्य अवधूत हे स्मरणगामी ।
अशक्य ही शक्य करतील स्वामी ॥१ ॥

जिथे स्वामीपाय तिथे न्यून काय ।
स्वये भक्त प्रारब्ध घडवी हि माय ॥
आज्ञेवीणा काळ ना नेई त्याला ।
परलोकीही ना भीती तयाला ॥२ ॥

उगाची भितोसी भय हे पळू दे ।
जवळी उभी स्वामीशक्ती कळू दे ॥
जगी जन्ममृत्यू असे खेळ ज्यांचा ।
नको घाबरू तू असे बाळ त्यांचा ॥३ ॥

खरा होई जागा श्रद्धेसहित ।
कसा होसी त्याविण तू स्वामीभक्त ॥
कितीदा दिला बोल त्यांनीच हात ।
नको डगमगू स्वामी देतील साथ ॥४ ॥

विभूती नमन नाम ध्यानादी तीर्थ ।

स्वामीच या पंचप्राणामृतात ॥

हे तीर्थ घे आठवी रे प्रचिती ।

न सोडील स्वामी जया घेई हाती ॥५ ॥